# <u>नियमित दिवाणी दावा क्र. ११०/२०२० मधील निशाणी ३५ खालील आदेश.</u>

(वसंत जाधव वि. दिलीप जाधव व इतर)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता ३९ नियम १ व २ प्रमाणे दाव्याचा अंतीम निकाल लागेपर्यंत प्रतिवादी यांनी वादीला दावा मिळकतीमधुन हुसकावुन लावु नये असा तात्पुरता मनाई आदेश मिळावा म्हणून दाखल केलेला आहे.

## <u>दावा मिळकत–</u>

२. मौजे भक्तवडी, ता. कोरेगांव, जि. सातारा येथील मिळकत खालीलप्रमाणे–

| अ. नं. | गट नं. | क्षेत्र<br>हे. आर | आकार<br>रु. पै. | हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १ | ३० | ०.०४<br>पो. ख. ०.०२ | ०.०९ | ०.०३<br>सामाईकात |
| २ | १९६ | ३.२२<br>पो. ख. १.०७ | ८.६२ | ०.८०.५०<br>सामाईकात |

यातील अर्धा हिस्सा सामाईक मालकी कब्जे वहिवाटीचा आहे. सदर मिळकत ही प्रस्तुत अर्जाचा वाद विषय असुन येथुन पुढे त्यास दावा मिळकत असे संभोदण्यात येते.

## <u>वादीचे अर्जातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणे–</u>

३. वादीने सदरचा दावा हा वाद मिळकत ही सामाईक मालकीहक्क कब्जेवहिवाटीच आहे असा जाहीर ठराव होवुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादी व प्रतिवादी यांचे पुर्वज बाबाजी नाना व त्यांचे बंधु तात्या नाना यांचे दरम्यान वाद मिळकती

संदर्भात दिनांक २४/०२/१९२३ रोजी फेरफार क्र. ३४९ मंजुर झाला. त्यानंतर बाबाजी यांचा वारस नातु नामदेव यांच्या नावाने फेरफार मंजुर झाला. नामदेव याने एकत्र कुटुंबाचा कर्ता म्हणून काही मिळकतींना चुलत भाऊ कुंडलीक गोपाळा जाधव यांच्या नावाची नोंद फेरफार नं. १११५ ने केलेली आहे.

४. वादी यांना वाद मिळकतीमध्ये अर्धा हिस्सा येतो. वाद मिळकती या नामा धोंडी यांच्या नावानेच राहीलेल्या आहेत. पैकी गट नं. ३० ही गावठान लगत परडेपड मिळकत असल्यामुळे वादी व प्रतिवादी यांचे सदर मिळकतीत अर्धा हिश्श्याने कब्जे वहिवाट होती. तसेच गट नं. १९६ ही देवस्थान मिळकत असल्यामुळे त्यांचे हिस्से सामाईकात राहीले आहेत. वाद मिळकत गट नं. ३० मध्येच उत्तर बाजुस ०.३ आर क्षेत्रात वादीचे कब्जे वहिवाट होती. वादी सदर मिळकतीचा वापर परडेपड म्हणून करत होता व त्यात त्यांची गुरे बांधत होता व जनावरांचा चारा, लाकुड फाडा शेती अवजारे ठेवत होता. सदर मिळकतीचे दक्षिणेस प्रतिवादी यांचे निवासी घर बांधलेले असुन तेथे त्यांचे वास्तव्य आहे. सदर प्रमाणे वादीची कब्जे वहिवाट आज अखेर अखंडीत चालु आहे.

५. दावा मिळकत गट नं. १९६ या मिळकतीमध्ये ४० आर क्षेत्रात वादी व प्रतिवादी सह इतर सहहिस्सेदारांचा सामाईक कब्जे वहिवाट होती. तसेच सदर मिळकतीत आंब्याची चार झाडे होती. सदर झाडांचे उत्पन्न वादी व प्रतिवादी सह अन्य सहहिस्सेदार त्यांच्या हिश्श्याप्रमाणे घेत होते व सामाईक कब्जे वहिवाट करुन सदर मिळकतीचा वापर गुरे चारण्यासाठी करत होता.

६. वरील प्रमाणे वस्तुस्थीती असताना प्रतिवादी याने वादी बरोबर नातेसंबधावरुन

वाद निर्माण करुन वाद मिळकतीचे हस्तांतरण व तबदीलीची भाषा करुन दाखविली व वाद मिळकतीतुन वादींना हुसकावुन लावण्याचा प्रयत्न केला. म्हणून वादीने सदर दावा दाखल केला. त्यानंतरही दिनांक २९/०१/२०२२ रोजी पोलीसांच्या मदतीने वादींना मिळकतीतुन हकलण्याचा प्रयत्न केला व गट नं. १९६ मधील वन विभागाची परवानगी न घेता झाडे तोडली व तेथे लेवलींगचे काम सुरु केले अशा तऱ्हेने प्रतिवादीने वादींना दावा मिळकतीतुन हुसकावुन लावण्याचा प्रयत्न केला. जर प्रतिवादी यांनी वादींना वाद मिळकतीतुन हुसकावुन लावले तर वादींचे कधीही पैशात न भरुन येणारे नुकसान होणार आहे. प्रथमदर्शनी केस व न्यायाचा समतोल हा वादीच्या बाजुने आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादीने दाव्याचा अंतीम निकाल लागेपर्यंत वादींना वाद मिळकतीतुन हुसकावुन लावु नये असा तात्पुरता आदेश व्हावा अशी विनंती केलेली आहे.

७. प्रतिवादी क्र. ७, १२ व १३ यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले व दाव्यातील कथनांना तीव्र आक्षेप नोंदविलेला आहे. प्रतिवादींच्या मते दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे व अपुर्ण आहे. त्यामुळे दाव्यातील मिळकतींचे योग्य ओळख होत नाही. त्यामुळे दावा नामंजुर होण्यास पात्र आहे. वादी अगर त्यांचे पुर्वहक्कदार पुंडलीक व गोपाळ अगर खंडू यांचा धोंडीबा यांच्याशी कोणताही संबध नव्हता. त्यामुळे वादीने दाव्यामध्ये धोंडीबाशी नातेसंबध जोडण्याचा प्रयत्न केवळ दावा मिळकतीमध्ये हिस्सा मिळण्यासाठी केलेला आहे. वास्तवीक सदर वादी अगर त्यांचे पुर्वहक्कदार यांचा प्रतिवादी अगर त्यांचे पुर्वहक्कदार यांचा कोणताही संबध नव्हता व नाही. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये वादी अगर त्यांचे पुर्वहक्कदार यांना हिस्सा असण्याचा अगर त्यांची कब्जे वहिवाट असण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. मिळकतीचे योग्य वर्णन दिलेले

नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती प्रतिवादीतर्फे करण्यात आली.

८. वादीचा अर्ज त्यावरील प्रतिवादींचे म्हणणे व इतर कागदपत्रे पाहता तसेच वादी व प्रतिवादी यांचे सुविद्य विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकता खालील मुद्दे माझे विचाराधीन आहेत. त्यावरील निष्कर्ष व त्यांची कारणमिमांसा खालीलप्रमाणे.

| **अ.न.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी सकृतदर्शनी केस त्याच्या बाजूने असल्याचे शाबीत करतात काय? | नाही. |
| २ | तुर्तातुर्त ताकिद न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय? | नाही. |
| ३ | न्यायाचा तोल त्याचे बाजूने असल्याचे वादी शाबीत करतात काय? | नाही. |
| ४ | काय आदेश? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

९. वादीने अर्जातील मागणी प्रथमदर्शनी सिध्द करण्यासाठी खालील दस्तऐवज दाखल केले आहेत.

| **अ. क्र.** | **कागदपत्रे** | **निशाणी** |
|---|---|---|
| १. | मौजे भक्तवडी, ता. कोरेगांव येथील जमिन गट नं. ३० चा ७/१२ उतारा | ८ |

| | | |
|---|---|---|
| २. | मौजे भक्तवडी, ता. कोरेगांव येथील जमिन गट नं. १९६ चा ७/१२ उतारा | ९ |
| ३. | वर्ष २०१९–२०२० गाव नमूना ८अ आसामीवार खातावणी जमाबंदी पत्रक दिनांक १९/०३/२०२० | १० |
| ४. | वर्ष २०१९–२०२० गाव नमूना ८अ आसामीवार खातावणी जमाबंदी पत्रक दिनांक ०३/१०/२०२० | ११ |
| ५. | प्रतिवादीने मे. कार्यकारी दंडाधिकारी सो कोरेगांव यांच्या समोर केलेल्या प्रतिज्ञापत्राची झेरॉक्स प्रत | ३/१ |
| ६. | वकीलांनी पाठविलेली नोटीस | ३/२ |
| ७. | वकीलांनी वादीस पाठविलेल्या नोटीसीची स्थपप्रत | ३/५ |
| ८. | दै. पुढारी पेपरला प्रतिवादींनी दिलेली जाहीर नोटीस | ३/६ |
| ९. | नोटीसीस दिलेल्या उत्तराची स्थळप्रत | ३/७ |
| १०. | मौजे भक्तवडी, ता. कोरेगांव येथील फेरफार नं. १११५ चा फेरफार उतारा | ३९ सोबत |
| ११. | वादी तर्फे प्रतिवादी विरूध्द दिनांक २९/०१/२०२२ रोजी दाखल फिर्यादीची प्रत | ३९ सोबत |
| १२. | वादीतर्फे दिनांक २४/०२/२०२२ रोजी पोलीस अधिक्षक सातारा यांना दिलेल्या अर्जाची प्रत | ३९ सोबत |
| १३. | वाद मिळकतीचे ३ फोटो | ३९ सोबत |
| १४. | मोबाईल फोटो प्रींटींग | ३९ सोबत |
| १५. | फेरफार नं. ३४९ चा उतारा | ३९ सोबत |

| | | |
|---|---|---|
| १६. | वादीने प्रतिवादी विरुध्द ता. १८/०४/२०२२ रोजी दिलेल्या फिर्यादीची प्रत | ४५ सोबत |
| १७. | वादींनी उपविभागीय अधिकारी कोरेगांव व डी. वाय. एस. पी. कोरेगांव यांना ता. १९/०४/२०२२ रोजी दिलेल्या फिर्यादी अर्जाची प्रत | ४५ सोबत |
| १८. | वादींची सातारारोड पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारी अर्जाची प्रत | ४५ सोबत |
| १९. | फोटो | ४५ सोबत |

१०. प्रस्तुत प्रकरणात वादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, वाद मिळकतीचे अद्याप सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. वादी हा वाद मिळकतीच्या सामाईक कब्जे वहिवाटीत आहे. वादी व प्रतिवादींचे नाव दाखल व्हावे म्हणून तहसिलदार कार्यालयात अर्ज दाखल केला होता. वादी व प्रतिवादी हे नाते संबधातील आहेत. वादी यांना वाद मिळकतीत हिस्सा येतो. सन १९५० पासुन वादी हा वाद मिळकतीच्या कब्जे वहिवाटीत आहे. प्रतिवादी हे वादीला वाद मिळकतीतुन हुसकावुन लावण्याच्या प्रयत्नात आहेत. वादीला जर वाद मिळकतीतुन हुसकावुन लावले तर प्रतिवादीचे अपरीमीत असे नुकसान होणार आहे. वादीच्या हक्कामध्ये प्रथमदर्शनी केस व न्यायाचा समतोल आहे. त्यामुळे वादीतर्फे सदर अर्ज मंजूर करुन प्रतिवादी यांनी वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करुन वाद मिळकतीतुन हुसकावुन लावु नये असा तात्पुरता मनाई आदेश पारीत करावा अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली.

११. याउलट प्रतिवादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, वादीचा वाद मिळकतीशी संबध आहे असे दाखविणारा कोणताही पुरावा वादीने दाखल केलेला नाही. वाद

मिळकतीवर वादीचा ताबे कब्जा नाही. प्रतिवादीने वादीचे कुटुंबाशी असलेला संबध नाकारलेला आहे. वादीने सबळ पुराव्या आधारे त्यांचा वाद मिळकतीतील कब्जा सिध्द करणे आवश्यक आहे. परंतु, प्रस्तुत प्रकरणात वादीने कब्जा संदर्भात कोणतेही दस्तऐवज दाखल केलेले नाहीत. त्यामुळे वादीच्या हक्कामध्ये प्रथमदर्शनी केस नाही. तसेच न्यायाचा समतोल व अपरीमीत हाणीचा मुद्दा हा वादीच्या बाजुने नाही. त्यामुळे सदर अर्ज नामंजुर करण्याची विनंती प्रतिवादीतर्फे करण्यात आला.

**<u>मुद्दा क्र. १ ते ३ करीता–</u>**

१२. वरील मुद्दे एकमेकांशी सलग्न असल्याने ते एकत्र विचाराधिन घेतले आहेत.

१३. प्रस्थापीत कायद्याचे तत्वानुसार तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज निकाली काढत असताना प्रथमदर्शनी अथवा सकृतदर्शनी केस, न्यायाचा समतोल व अपिरीमीत हाणीचा मुद्दा हे घटक वादीच्या बाजुने आहेत का ? हे पाहणे आवश्यक असते. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात प्रथमदर्शनी केस, न्यायाचा समतोल व अपरिमीत हाणीचा मुद्दा हा वादीच्या बाजुने आहे का व त्याअनुशंगाने पुरावा अभिलेखावर आहे का हे पाहणे आवश्यक आहे.

१४. प्रस्तुत प्रकरणात वादीने असे कथन केले आहे की, तो वाद मिळकतीच्या सामाईक कब्जे वहिवाटीस आहे. वाद मिळकतीचे अद्याप सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. प्रस्तुत प्रकरणात वाद मिळकत ही सामाईक कब्जे वहिवाटीत आहे ही बाब प्रथमदर्शनी सिध्द करण्याची जबाबदारी वादी यांच्यावर आहे. वादीने प्रस्तुत प्रकरणात निशाणी ३ सोबत मौजे भक्तवडी, ता. कोरेगांव येथील गट नं. ३० व गट नं. १९६ चा ७/१२ उतारा दाखल केलेला आहे. सदर ७/१२ उताऱ्यावरुन असे दिसुन येते की, वादी यांचे नाव सामाईक

क्षेत्राच्या कब्जे सदरी नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात दाखल ७/१२ उतारा हा वादीच्या कथनाला पुष्ठी देत नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणात वादीने निशाणी ३ सोबत कार्यकारी दंडाधिकारी यांच्या समोर केलेले हेमंत जाधव यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सदर प्रतिज्ञापत्र हे वारसां संदर्भात आहे. त्यावरुन वादीचा वाद मिळकतीमध्ये कब्जा आहे असा निष्कर्ष निघत नाही.

१५. प्रस्तुत प्रकरणात वादीने असे कथन केले आहे की, निशाणी ३९ व ४५ सोबत दाखल केलेल्या फोटोवरुन वादी हा वाद मिळकतीच्या ताबे कब्जात असल्याचे दिसुन येते. परंतु, प्रस्थापीत कायद्याच्या तत्वानुसार फोटो हा ताबे कब्जाचा पुरावा असु शकत नाही. तसेच वादीने प्रस्तुत प्रकरणात फोटोग्राफरचे शपथपत्र दाखल केलेले नाही. त्यामुळे केवळ फोटोवरुन वादी हा वाद मिळकतीच्या ताबे कब्जात आहे असे म्हणता येणार नाही.

१६. प्रस्तुत प्रकरणात वादीने मौजे भक्तवडी येथील फेरफार नं. १११५ ची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे. सदर प्रतीचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, नामदेव जाधव याने त्याच्या नावावर असलेली जमीन सोपान जाधव, कुंडलीक जाधव, भिकु जाधव व रघुनाथ जाधव यांच्या नावे करण्यासाठी अर्ज दिला होता. त्यानुसार सोपान, कुंडलीक, भिकु व रघुनाथ यांच्या नावे नोंद झालेल्या आहेत. परंतु, सदर फेरफार उताऱ्यामध्ये प्रस्तुत प्रकरणात वाद मिळकत समाविष्ठ असल्याचे दिसुन येत नाही. तसेच वादीने निशाणी ३९ सोबत फेरफार क्र. ३४९ च्या उताऱ्याची झेरॉक्सप्रत दाखल केली आहे. सदर उताऱ्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये दावा मिळकतीचा उल्लेख असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे वरील दोन्ही दस्तऐवज वादीने कथीत केलेल्या नाते संबधांना पुष्ठी देतात. परंतु, वादीच्या वाद

मिळकतीवरील ताबे कब्जास पुष्ठी देत नाहीत.

१७.　　प्रस्तुत प्रकरणात नमूद करण्यासारखी गोष्ट अशी की, वादीने त्यांचा वाद मिळकतीवरील ताबे कब्जा दाखविण्यासाठी केवळ फोटो व त्याने दाखल केलेल्या एन. सी. च्या प्रती दाखल केलेल्या आहेत. त्यामुळे त्यावरुन वादी हा दाव्यात कथीत केल्याप्रमाणे वाद मिळकतीचा कब्जेदार आहे असे प्रथमदर्शनी म्हणता येणार नाही. वादीने इतर कोणत्याही त्यांच्या शेजारच्या व्यक्तीचे शपथपत्र याकामी दाखल केलेले नाही. त्यामुळे वादीच्या दावा मिळकतीतील ताबे कब्जातील कथनांस कोणत्याही लेखी दस्तऐवजातुन पुष्ठी मिळत नाही. प्रस्तुत प्रकरणात वादी यांनी त्यांचा वाद मिळकतीवरील कब्जा दाखविण्यासाठी कोणतेही दस्तऐवज अभिलेखावर दाखल केलेले नाहीत. त्यामुळे वादीचा वाद मिळकतीवरील ताबे कब्जा आहे असे म्हणता येणार नाही.

१८.　　प्रस्तुत प्रकरणात वादीचे विधीज्ञांनी त्यांच्या अर्जातील कथनाला पुष्ठी देण्यासाठी अधीयार छेनाजी वि. मनीबेन जगमलभाई २०२२ लाईव लॉ सुप्रीम कोर्ट २४१ या न्यायनिर्णयाचा दाखला दिला. मी वरील न्यायनिर्णयातील निष्कर्षाचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणात वादीने त्याचा वाद मिळकतीवरील सामाईक कब्जा दाखविण्याठी कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. तसेच वरील न्यायनिर्णयातील तथ्ये व या प्रकरणातील तथ्ये ही वेगवेगळी आहेत. त्यामुळे वरील न्यायनिर्णयातील निष्कर्ष याकामी लागु पडत नाहीत.

१९.　　एकंदरीत, वादी हा वाद मिळकतीच्या ताबे कब्जात असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जाच्या अनुशंगाने वादीच्या हक्कामध्ये प्रथमदर्शनी केस

नाही असे म्हणावे लागेल. तसेच न्यायाचा समतोल व अपरीमीत हाणीचा मुद्दा ही वादीच्या बाजुने नाहीत. त्यामुळे सदर अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. करीता मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवितो व मुद्दा क्र. ४ साठी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

## आदेश

१. निशाणी ३५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. दोन्ही पक्षकारांनी आपापला खर्च सोसावा.

Digitally signed by ATUL BHIMRAO PATIL
Date: 2022.06.20 13:07:07 +0530

कोरेगाव.

दि. १७/०६/२०२२

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.